ANNEXURE-XI

# SURETECH COLLEGE OF NURSING, NAGPUR

## LIST OF WELFARE SCHEMES UNDER MUHS

| SR. NO. | NAME OF SCHEMES |
|---|---|
| 1. | Earn & Learn Schemes |
| 2. | Dhanwantari Vidyadhan Scheme |
| 3. | Savitribai Fule Vidyadhan Scheme |
| 4. | Bahishal Shikshan Mandal Scheme |

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

PRINCIPAL

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

Welfare Annex-XI


# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**Maharashtra University of Health Sciences, Nashik**

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004.

**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539170, **Phone :** 0253-2539173

**E-mail :** sw@muhs.ac.in **Web.:**www.muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
M.D. (Ayurved)
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्लु/स्कीम/ ४९१ /२०२३

दिनांक: २० / ०३ /२०२३

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य
ज्ञानपथ बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक,
मंडळाचे शुअरटेक परिचर्या महाविद्यालय,
१२०/२ फे, अशोकवन, एन.एच.७, वर्धा रोड,
पोस्ट खडी, नागपुर - ४४११०८

विषय : सावित्रीबाई फुले-मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. केल्याबाबत...

संदर्भ : **मआविवि/एसडब्ल्यु/स्कीम/६८१/२०२२ दि.०१/०६/२०२२**

**महोदय / महोदया,**

विद्यापीठाने लागू केलेल्या सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेसाठी, आपल्या महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता प्रस्ताव प्राप्त झाले. सदर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर योजनेच्या अटी व शर्तीनुसार अनुदान मिळणेसाठी खाली नमुद केलेल्या विद्यार्थीनींचा प्रस्ताव पात्र ठरला आहे.

१) गौतम कपाली छोटेलाल
२) 
३) 
४) 
५) 

सदर विद्यार्थीनींस वर्ष २०२२-२३ साठी सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेच्या अनुदानातून **रु.२५,०००/-** इतकी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येत आहे. ही रक्कम सदर विद्यार्थीनींच्या बचत खात्यात दि. **१८/०३/२०२३ रोजी** आर.टी.जी.एस. करण्यात आली आहे.

आपणांस विनंती करण्यात येते की, *सदर रक्कम विद्यार्थीनींच्या बचत खात्यात* आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच पावती या पत्रासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात भरुन दि. २८/०४/२०२३ पर्यंत उलट-टपाली महाविद्यालयाचे अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या सही व शिक्यानिशी विद्यापीठास पाठवावी.

धन्यवाद !

Received
11/4/2023

संचालक
विद्यार्थी कल्याण

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

सोबत : १) विहित नमुन्यातील नमुना पावती

आ. क्र - 452
11.4.2023

संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ,
नाशिक - ४२२ ००४

विषय : सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचे अनुदान आर.टी.जी.एस. झाल्याची पोहोच पावती.

संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यू /स्किम /६८१/२०२२ दि.०१/०६/२०२२

महोदय / महोदया,

मला उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचे, अनुदान आर.टी.जी.एस. द्वारे दि. १८/०३/२०२३ रोजी प्राप्त झाले आहे.

सदर शिष्यवृत्ती रक्कमेचा उपयोग मी माझ्या शिक्षणासाठी करणार आहे असे प्रतिज्ञापूर्वक नमुद करते.

धन्यवाद !

सही...

( )

विद्यार्थीनीचे नाव

महाविद्यालयाचा शिक्का

(अधिष्ठाता / प्राचार्यांची सही)

Dnyanpath Bahu-Uddeshiya ...
Regd.No. Mah.F-11020 (NAGPUR)
# SURETECH COLLEGE OF NURSING
B.B.Sc. (N) (Affiliated to MUHS) College Code No. : 6515003
Address : 120/2k, Ashokvan, National Highway No. 7, Wardha Road, Pist Rui. Nagpur - 441 108.
Phone No.: 8411911778, 8411911770 E-mail : suretechcon1@yahoo.in Website : suretechcon.edu.in

दिनांक : 09 / 09 / 2022

SCON/ B.Sc.(N) / 938/2022

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

विषय : शैक्षणिक वर्ष 2022.–23 करीता सावित्रीबाई फुले –मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचा प्रस्ताव सादर करणेबाबत.
संदर्भ : मआविवि / एसडब्ल्यू / स्किम / १४८/२०२२ मुदतवाढ परिपत्रक दिं. २९/०७/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये शैक्षणिक वर्ष 2022–23 करीता सावित्रीबाई फुले –मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावामध्ये अर्जातील बि एस सी नर्सिंग अभ्यासक्रमातील परीक्षेचा निकाल येणे प्रलंबित असल्यामुळे गुणपत्रीका जोडले नाही. परीक्षेचा निकाल आल्यानंतर गुणपत्रीका आपल्या कार्यालयास सादर करण्यात येईल ही विनंती करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद!

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

सहपत्र :
1) 1(एक) विद्यार्थ्याचा अर्ज

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 173
**Website** : www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
**M.D. (Ayurved)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/ ६९८/२०२२ दि. २९/०७/२०२२

- मुदतवाढ परिपत्रक -

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

विषय : **विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरीता विद्यापीठाने लागू केलेल्या कमवा व शिका योजना, बही:शाल शिक्षण मंडळ योजना व सावित्रीबाई फुले – मुलींनकरता शिष्यवृत्ती योजना २०२२-२३ मुदत वाढ देण्याबाबत.**

संदर्भ : मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८२/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)
मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८०/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)
मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८१/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)

महोदय/महोदया,

**आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी लागू केलेल्या कमवा व शिका योजना, बही:शाल शिक्षण मंडळ योजना व सावित्रीबाई फुले – मुलींनकरता शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताचे प्रस्ताव दि. २९/०७/२०२२ पर्यंत मागविण्यात आले होते. परंतू या योजनेचा लाभ घेण्यास विद्यार्थी वंचित राहू नये याकरीता **प्रस्ताव स्वीकारण्याची मूदत वाढवून दि. १५/०९/२०२२ अशी करण्यात आली आहे. सदर मुदतवाढीची नोंद घेऊन विद्यार्थ्यांचे प्रस्ताव दि. १५/०९/२०२२ पर्यंत संदर्भीय परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार विद्यापीठास प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवावे.** तद्नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (**Departments → Student's Welfare Dept. → Circular)** संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

Principal
Suretech College of Nursing

संचालक
विद्यार्थी कल्याण

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539170, 173
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
M.D. (Ayurved)
**Director, Student Welfare**

मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/ ६८७ /२०२२

दिनांक: ०१/०६/२०२२

"परिपत्रक क्र.९५/२०२२"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

विषय :- सावित्रीबाई फुले - मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेबाबत...

महोदय/महोदया

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपूर्व नियमित शिक्षण घेणा-या व मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या तसेच नियमित पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गरीब, गरजु, व हुशार विद्यार्थीनींचे प्रस्ताव अर्ज (परिशिष्ट "अ") प्रमाणे मागविण्यात येत आहेत.

सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना करीता मा. अधिष्ठाता/प्राचार्यांनी प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यापूर्वी विद्यार्थीनीने सादर केलेल्या प्रस्तावाची छानन्नी करुन ती पात्र आहे किंवा नाही हे तपासून पाहावे. तसेच सदर योजनेची आवश्यकता असल्याची पूर्ण खात्री करुनच प्रस्ताव पाठविण्यात यावे. विद्यार्थीनींना भारत सरकार/शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा फी सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असेल किंवा मिळणार असेल अशा विद्यार्थीनींचे प्रस्ताव अपात्र ठरविण्यात येतील. विद्यार्थीनींनी महाविद्यालयामार्फत विद्यापीठास दि. २९/०७/२०२२ पर्यंत प्रस्ताव सादर करावे.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

(सदर योजनेकरीता आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता करण्यात आलेला आर्थिक तरतू... आधीन राहून प्रति महाविद्यालय प्रति विद्यार्थीनी कमी होऊ शकतात याची नोंद घ्यावी.)

सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थीनींचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह **दि. २९/०७/२०२२** पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी नियमावलीनुसार व विद्यापीठाच्या प्राधिकरणाने वेळोवेळी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करुन अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले आहेत.

**संचालक**
**विद्यार्थी कल्याण**

**प्रत माहितीस्वत:** १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

टिप :

**१) वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2022-23 उपलब्ध आहे.**

**२) महाविद्यालयाने प्रस्तावांची पुर्तता करतांना तपासणी सूची (सहपत्र "ब") प्रमाणे दस्तावेज तपासून अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.**

Principal
Suretech College of Nursing
Nagpur

## – सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना नियमावली –

(५.१) **प्रस्तावना** :- विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रमाच्या मागील शैक्षणिक वर्षाच्या विद्यापीठाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या तसेच, नियमित पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणाऱ्या गरजु, हुशार व पात्र विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती देणे हा सदर योजनेचा उदेश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(५.२) सदर योजनेचा लाभ घेण्यास संलग्नीत महाविद्यालयातील पदवीपूर्व अभ्यासक्रमाचे नियमित शिक्षण घेणाऱ्या व मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या, तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमास नियमित शिक्षण घेणाऱ्या (ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरीता प्रथम वर्ष झाल्यानंतर विद्यापीठ परिक्षा घेत असेल अशा अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या) गरजू व हुशार विद्यार्थीनी पात्र असतील.

(५.३) खालील विद्यार्थीनी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील.

(I) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी विद्यार्थीनी;

(II) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थीनी;

(III) परराज्यातून आलेल्या (Other than Maharashtra State -OMS) विद्यार्थीनी; आणि,

(IV) व्यवस्थापन कोटयातुन (Management Quota) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यीनी.

(५.४) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या अधिष्ठाता / प्राचार्यांनी प्रस्ताव विद्यापीठास पाठविण्यापूर्वी, विद्यार्थीनीने त्यांच्याकडे सादर केलेल्या अर्जाची व त्यासोबतच्या दस्तऐवजांची छाननी करुन ती पात्र आहे किंवा कसे आणि सदर योजनेची आवेदनकर्त्या विद्यार्थीनीला आवश्यकता असल्याची खात्री करुनच गरजू विद्यार्थीनींचे प्रस्ताव विद्यापीठास सादर करावेत. पदवी अभ्यासक्रमास १०० पर्यंत प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून तीन विद्यार्थीनी, १०१-१५० प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून चार विद्यार्थीनी, १५१-२०० प्रवेश क्षमता असलेल्या संलग्नीत महाविद्यालयातून पाच पात्र व गरजु विद्यार्थीनी या प्रमाणात प्रस्ताव विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करावेत. तसेच, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास (सर्व विषयांतील अभ्यासक्रम मिळुन) प्रवेशित एका संलग्नीत महाविद्यालयातून केवळ १ पात्र व गरजु विद्यार्थीनीचा प्रस्ताव विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करावा. याव्यतिरिक्त जास्तीचे प्रस्ताव सादर केल्यास असे अतिरिक्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. सदर प्रमाणात परिस्थितीनीरुप आवश्यक तसे बदल करण्याचे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असतील.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

... तरतुदीत विहित प्रमाणापैकी सदर योजनेअंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षातील ... केलेल्या रक्कमेपैकी ३ टक्के रक्कम दिव्यांग विद्यार्थीनींसाठी राखीव असेल. संलग्नीत महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थीनींचे प्रस्ताव महाविद्यालय स्तरावर अधिष्ठाता/प्राचार्य यांनी निवड करुन विद्यापीठास सादर करावेत. "प्रथम प्राप्त प्रथम प्राधान्य" या तत्वावर सदर आरक्षित रक्कमेच्या अनुदानाचे वाटप करण्यात येईल. दिव्यांग विद्यार्थीनींचे प्रस्ताव प्राप्त न झाल्यास राखिव रक्कम ईतर पात्र सर्वसाधारण पात्र विद्यार्थीनींना वितरीत करण्यात येईल.

(५.६) ज्या आवेदनकर्त्या विद्यार्थीनींच्या पालकांचे मागील लगतच्या आर्थिक वर्षातील कमाल वार्षिक उत्पन्न शासन / विद्यापीठाने वेळोवेळी विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल अश्या विद्यार्थीनी सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील.

(५.७) महाविद्यालयातील पात्र आवेदनकर्त्या विद्यार्थीनींची यादी तयार करतांना ज्या विद्यार्थीनीच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थीनींना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतुदीअंतर्गत प्रत्येक पात्र आवेदनकर्त्या विद्यार्थीनीस रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र) च्या कमाल मर्यादेत अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(५.८) विद्यापीठाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सदर योजनेकरीताच्या एकुण तरतुदीपेक्षा जास्त रक्कमेकरीताचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास प्रती महाविद्यालय प्रती विद्यार्थीनी यांचे अनुदानाच्या रक्कमेचे उपरोल्लेखीत प्रमाण कमी करण्यात येईल.

(५.९) सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थीनींपैकी पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी I) संबंधीत विद्यार्थीनींने मागील शैक्षणिक वर्षातील विद्यापीठाच्या परीक्षेत प्राप्त केलेले एकुण गुण II) संबंधीत विद्यार्थीनींना समान गुण असल्यास सदर विद्यार्थीनी किती प्रयत्नात (Attempts) विद्यापीठाची मागील लगतच्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाली आहे या निकषांचा अनुक्रमे आधार घेण्यात यावा.

(५.१०) पात्र व गरजु विद्यार्थीनींना त्यांच्या नियमीत शैक्षणिक कारकीर्दीमध्ये (अभ्यासक्रमात) विद्यापीठाच्या इतर योजनांच्या लाभाबरोबरच सदर योजनेचा लाभ देखील अनुज्ञेय असेल. तथापि, आवेदनकर्त्या विद्यार्थीनींना केंद्र किंवा राज्य शासनाच्या किंवा अन्य प्राधिकरणाकडुन शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप, शुल्क परतावा, शुल्क सवलत किंवा इतर काही अनुदान/लाभ मिळत असेल किंवा मिळणार असेल अशा विद्यार्थीनींचे प्रस्ताव सदर योजनेकरीता अपात्र ठरविण्यात येतील.

Principal
Suretech College of ...
Nagpur.

लाभ घेण्यास पात्र नसतील.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्द्तीने विद्यार्थ्यांकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द् झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन (स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा

Principal
Suretech College of Nursing
Nagpur

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,

Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 179

**Website** : www.muhs.ac.in, **E-mail :** sw@muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
**M.D. (Ayurved)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्कीम/४४२/२०२३

दिनांक : १० /०३ /२०२३

**"परिपत्रक क्र. ०१ /२०२३"**

प्रति,

मा. अधिष्ठाता/प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म.आ.वि.वि. नाशिक.

**विषय :** धन्वंतरी विद्याधन योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ बाबत...

**मा.महोदय / महोदया,**

(३.१) प्रस्तावना : धन्वंतरी विद्याधन योजनेत विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमाच्या ज्या नियमित विद्यार्थ्यांनी शिक्षणाकरीता बँकेकडून महाविद्यालयाचे शिक्षण शुल्क भरण्याकरीता कर्ज घेतले असेल अशा कर्जावरील व्याजाच्या रक्कमेच्या परताव्याकरीता ठराविक मर्यादिपर्यंत विद्यापीठातर्फे अनुदान देणे हा सदर योजनेचा उददेश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात येत आहे.

(३.२) सदर योजनेचा लाभ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित, मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व पात्र विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल.

(३.३) खालील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील;

(I) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी;

(II) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थी;

(III) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State - OMS) विद्यार्थी;

(Iv) व्यवस्थापन कोटयातून (Management Quota) प्रवेश घेतलेले विद्यार्थी.

(३.४) विद्यार्थ्यास केंद्र किंवा राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थांकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप, शुल्क परतावा, शुल्क सवलत मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. तथापि, महाराष्ट्र शासनातर्फे राबविली जात असलेली (Education

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही.

(३.५) विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क भरण्याकरीता बँकेकडून संपुर्ण कर्ज एकरक्कमी घेतलेली असेल किंवा मंजूर झालेल्या कर्जापैकी दरवर्षी कर्जाची हप्त्यात रक्कम घेत/घेणार असेल, अशा प्रत्येक संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या १५% पदवी व १०% पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या नियमित व पात्र विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

(३.६) ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे/कुटुंबाचे सर्व स्त्रोतांतून प्राप्त होणारे वार्षिक उत्पन्न रुपये ०८ (आठ) लक्ष पेक्षा कमी असेल असे विद्यार्थी सदर योजनेचा लाभ घेऊ शकतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी व प्रस्ताव तयार करतांना सदर योजनेचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. विद्यापीठाच्या दरवर्षीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीच्या मर्यादेत अनुदान वाटपाची कमाल मर्यादा प्रति पात्र विद्यार्थी रु. ३०,०००/- (तीस हजार मात्र) असेल. सदर रक्कमेत वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असेल.

(३.७) विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाकडुन प्राप्त होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रस्तावानुसार व्याजाच्या रक्कमेची / अनुदानाची परीगणना करण्यासाठी विद्यार्थ्याने त्यालगतच्या मागील आर्थीक वर्षाचे कालावधीत शैक्षणिक कर्जावर बँकेने आकारलेले व्याज व विद्यार्थ्यांच्या पालकाच्या कुटुंबाचे एकत्रित उत्पनाचा दाखला ग्राहय धरण्यात येईल.

(३.८) शिक्षणशुल्क समितीने संलग्नित महाविद्यालयासाठी निर्धारीत केलेले शुल्क विचारात घेऊन विद्यार्थ्याने १२ महिन्यांच्या कालावधीमध्ये ज्या महिन्यात शैक्षणिक कर्ज घेतले असेल, तो महिना सोडून त्याच्या पुढील महिन्यापासुन कर्ज रक्कमेवरील व्याज रकमेची परिगणना करण्यात यावी.

(३.९) शैक्षणिक कर्जाच्या व्याजाचे अनुदान देतांना शिक्षण शुल्क समितीने संबंधीत महाविद्यालयाचे चालु वर्षाचे निर्धारीत केलेले शिक्षण शुल्क ग्राहय धरले जाईल. शिक्षण शुल्क समितीने संबंधीत महाविद्यालयाचे चालु वर्षाचे शिक्षण शुल्क निर्धारीत केलेले नसल्यास लगतच्या मागील वर्षाचे शिक्षण शुल्क समितीने निर्धारीत केलेले शिक्षण शुल्क ग्राहय धरण्यात यावे. तसेच, ज्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या शैक्षणिक प्रवेशानंतर एकरक्कमी कर्ज घेतलेले असेल अशा विद्यार्थ्यांना त्या आर्थिक वर्षातील व्याजाच्या रकमेची परीगणना करुन व्याजापोटी विद्याधन अनुदान अनुज्ञेय असेल.

(३.१०) सदर योजनेचा लाभ घेऊ ईच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिपुर्ण प्रस्ताव महाविद्यालयामार्फत विद्यापीठास विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक असेल. सदर योजनेची माहिती, त्याबाबतचे भित्तीपत्र व मुदतीबाबतचे परिपत्रक विद्यापीठ सर्व संलग्नित महाविद्यालयांना टपालाद्वारे पाठवेल. सदर माहिती भित्तीपत्र व परिपत्रक महाविद्यालयाने सुचना फलकावर लावणे

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन देणे आवश्यक असेल. प्रस्तावासोबत खालील दस्ताऐवज जोडणे आवश्यक असेल.

(I) विद्यार्थ्यांचा प्राचार्यानी साक्षांकीत केलेला संपुर्ण माहिती भरलेला नमुना आवेदन अर्ज; (सहपत्र अ)

(II) विद्यार्थ्यांचे स्वयंघोषणापत्र; (सहपत्र ब)

(III) ज्या बॅकेंतुन शैक्षणिक कर्ज घेतलेले असेल त्या बॅंकेच्या व्यवस्थापकांच्या सही शिक्क्यासह विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यातील बॅकेचे मुळ पत्र (सहपत्र क) (मंजूर झालेल्या कर्जापैकी प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेल्या कर्जाचा व कर्जावरील व्याजदरासह होणाऱ्या व्याज रक्कमेचा त्यामध्ये स्पष्ट उल्लेख असावा).

(IV) लगतच्या गतवर्षी उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची विद्यार्थ्यांनी स्वयंसाक्षांकित केलेली छायाप्रत.

(V) आवेदक विद्यार्थ्यांच्या पालकांच्या एकत्रित उत्पन्नाचा लगतच्या गतवर्षाच्या दाखल्याची (आर्थिक वर्ष २०२१-२२) मुळ प्रत किंवा स्वयंसाक्षांकीत केलेली छाया प्रत. तहसीलदार/ सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमीत केलेल्या उत्पनाच्या दाखल्या - व्यतिरीक्त इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही.

(VI) व्याजाच्या रक्कमेची मागणी केलेल्या आर्थिक वर्षातील (१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३) या कालावधीचे बॅकेने दिलेली कर्जउताऱ्याची (Loan Statement) मुळ प्रत.

(VII) आवेदक विद्यार्थ्यांच्या आधारकार्डची विद्यार्थ्यांनी स्वयंसाक्षांकीत केलेली छायाप्रत.

(३.११) प्रस्तावासोबत सादर केलेल्या बॅकेने दिलेल्या कर्जखात्याच्या उताऱ्यामध्ये (स्टेटमेंटमध्ये) किंवा बॅक व्यवस्थापकांच्या पत्रामध्ये प्रमाणित केल्याप्रमाणे प्रत्यक्ष आकारण्यात आलेला व्याज दर किंवा जास्तीत जास्त १५% व्याजदर या पैकी जो कमी असेल त्या दराने कर्ज रक्कमेवरील व्याजाची परिगणना करण्यात येईल.

(३.१२) विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झालेला असेल तर असा प्रस्ताव नाकारण्याचे विद्यापीठास अधिकार असतील. तसेच ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. उशिरा किंवा अपुर्ण प्रस्तावासंबंधी विद्यार्थ्यांकडुन किंवा त्यांच्या पालकांकडुन विद्यापीठास प्राप्त तक्रारीची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयांवर असेल.

(३.१३) विद्यार्थ्यांनी ज्या बॅंकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले आहे अशा संबंधीत बॅंकेचा शैक्षणिक कर्ज खाते नंबर, शाखेचे नाव, आय.एफ.एस.सी कोड, इ. बॅंक खाते बाबत विस्तृत नमुद करण्यात यावे जेणेकरुन विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कर्ज खात्यात आरटीजीएस द्वारे अनुदान रक्कम वर्ग करण्यात येईल.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

## योजनांसंबधी संकिर्ण तरतुदी

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द् झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन (स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्यांच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्यांच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्द्तीने विद्यार्थ्यांकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह **दि. २८/०४/२०२३** पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. विलंबाने प्राप्त झालेल्या किंवा अपुर्ण प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

वर नमूद केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व हक्क विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आले आहेत. योजनाबाबतचा तपशील विद्यापीठाच्या www.muhs.ac.in (Departments → Students' Welfare Dept. → Circular) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
विद्यार्थी कल्याण

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

©
Dnyanpath Bahu-Uddeshiya Shikshan Prasarak Mandal's
Regd.No. Mah.F-11020 (NAGPUR)

# SURETECH COLLEGE OF NURSING

B.B.Sc. (N) (Affiliated to MUHS) College Code No. : 6515003
Address : 120/2k, Ashokvan, National Highway No. 7, Wardha Road, Pist Rui. Nagpur - 441 108.
Phone No.: 8411911778, 8411911770 E-mail : suretechcon1@yahoo.in Website : suretechcon.edu.in

**SCON/ B.Sc.(N) / 939 /2022** दिनांक : 09 / 09 / 2022

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी कल्याण विभाग,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
नाशिक.

विषय : शैक्षणिक वर्ष 2022.–23 करीता कमवा व शिका योजनेचा प्रस्ताव सादर करणेबाबत.
संदर्भ : मआविवि / एसडब्ल्यू / स्किम / १४८/२०२२ मुदतवाढ परिपत्रक दिं. २९/०७/२०२२

महोदय,

उपरोक्त विषयांकीत संदर्भान्वये शैक्षणिक वर्ष 2022–23 करीता कमवा व शिका योजनेचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर प्रस्तावामध्ये अर्जातील बि एस सी नर्सिंग अभ्यासक्रमातील परीक्षेचा निकाल येणे प्रलंबित असल्यामुळे गुणपत्रीका जोडले नाही. परीक्षेचा निकाल आल्यानंतर गुणपत्रीका आपल्या कार्यालयास सादर करण्यात येईल ही विनंती करीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

धन्यवाद!

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

सहपत्र :
1) 4 (चार) विद्यार्थ्यांचे अर्ज

Principal
Suretech College of Nursing
Nagpur

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,
Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 173
**Website** : www.muhs.ac.in, **E-mail** : sw@muhs.ac.in

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
**M.D. (Ayurved)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/ ९४८/२०२२ दि. २९/०७/२०२२

**- मुदतवाढ परिपत्रक -**

प्रति,
मा.अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
मआविवि, नाशिक

**विषय : विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरीता विद्यापीठाने लागू केलेल्या कमवा व शिका योजना, बही:शाल शिक्षण मंडळ योजना व सावित्रीबाई फुले - मुलींनकरता शिष्यवृत्ती योजना २०२२-२३ मुदत वाढ देण्याबाबत.**

**संदर्भ :** मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८२/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)
मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८०/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)
मआविवि/एसडब्ल्यू/स्किम/६८१/२०२२ दि. ०१/०६/२०२२ (परिपत्रक)

महोदय/महोदया,

आपले लक्ष उपरोक्त संदर्भीय विषयाकडे वेधण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाद्वारे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी लागू केलेल्या कमवा व शिका योजना, बही:शाल शिक्षण मंडळ योजना व सावित्रीबाई फुले - मुलींनकरता शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीताचे प्रस्ताव दि. २९/०७/२०२२ पर्यंत मागविण्यात आले होते. परंतू या योजनेचा लाभ घेण्यास विद्यार्थी वंचित राहू नये याकरीता **प्रस्ताव स्वीकारण्याची मूदत वाढवून दि. १५/०९/२०२२ अशी करण्यात आली आहे. सदर मुदतवाढीची नोंद घेऊन विद्यार्थ्यांचे प्रस्ताव दि. १५/०९/२०२२ पर्यंत संदर्भीय परिपत्रकात नमूद केलेल्या अटी व शर्तीनूसार विद्यापीठास प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवावे.** तद्नंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. योजनांची अधिक माहिती विद्यापीठाच्या **www.muhs.ac.in** (**Departments → Student's Welfare Dept. → Circular**) संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
विद्यार्थी कल्याण

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**

वणी-दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४,

Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004

**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539170, 173

**Website** : www.muhs.ac.in, **E-mail** : sw@muhs.ac.in

MUHS

**डॉ. मनोजकुमार बी.मोरे**
एम.डी. (आयुर्वेद)
**संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Dr.Manojkumar B. More**
**M.D. (Ayurved)**
**Director, Student Welfare**


मआविवि/एसडब्लु/स्कीम/ ६८२ /२०२२ **दिनांक** : ०१/०६/२०२२

**"परिपत्रक क्र. १६ /२०२२"**

**प्रति,**
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म. आ. वि. वि. नाशिक.

**विषय : कमवा व शिका योजनेबाबत...**

**महोदय/ महोदया,**

कमवा व शिका योजनेचे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये पदवीपुर्व नियमित शिक्षण घेत असलेल्या गरीब, गरजु, हुशार विद्यार्थ्यांचे प्रस्ताव विद्यापीठामार्फत मागविण्यात येत आहेत.

कमवा व शिका योजनेत आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिंक्षण थांबू नये याच भूमिकेतून विद्यापीठाने **"कमवा व शिका"** ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या कामांची संधी उपलब्ध करुन देऊन त्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो मेहनताना देवून त्यांच्या आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे.

कमवा व शिका या योजने अंतर्गत **एका महाविद्यालयांतुन पाच प्रस्ताव स्विकारण्यात येतील.** सदर योजनेअंतर्गत ३% आरक्षण दिव्यांग विद्यार्थ्यासाठी असेल तसेच आपल्या महाविद्यालयातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालय स्तरावर निवड करुन सादर करण्यात यावेत. उपरोक्त नियमावली अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांच्या कव्हरींग लेटरसह **दि.२९/०७/२०२२** पर्यंत विद्यापीठात स्विकारण्यात येतील. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठीची नियमावली सोबत जोडलेली आहे. उशिरा तथा विलंबाने प्राप्त झालेल्या कोणत्याही प्रस्तावावर विद्यापीठ कार्यवाही करणार नाही.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

तसेच योजने सबंधीचे प्रस्ताव अर्ज (विहित नमुन्यातील सहपत्र "अ") व इतर कागदपत्रे विद्यार्थी कल्याण विभागात परस्पर स्वीकारले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी.

विद्यापीठाच्या योजना हया विद्यार्थ्यांना मिळणारी सवलत आहे, त्यांचा हक्क नाही असे त्यांना अवगत करण्यात यावे. तसेच सर्व अटी व शर्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे व त्यात बदल करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखीव ठेवलेले आहेत.

संचालक
विद्यार्थी कल्याण

प्रत माहितीस्तव : १) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक
२) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, मआविवि, नाशिक
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक

टिप :

**१) वर नमुद योजनेची सविस्तर माहिती, नियमावली, विविध अर्ज व नमुने विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर Department → Student Welfare→ Circular 2022-23 उपलब्ध आहे.**

**२) महाविद्यालयाने प्रस्ताव सादर करतांना तपासणी सूची (सहपत्र "ब") प्रमाणे दस्तावेज तपासुन अनुक्रमाप्रमाणे पृष्ठांकीत करुन सादर करावेत.**

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

## कमवा व शिका योजना नियमावली

(७.१) **प्रस्तावना** :- विद्यापीठांतर्गत आरोग्य विज्ञानाच्या अभ्यासक्रमास प्रवेशीत कोणत्याही विद्यार्थ्यांचे शिक्षण आर्थिक अडचणीमुळे थांबू नये या भूमिकेतून व विद्यार्थ्यास काही प्रमाणात आर्थिक स्वावलंबी बनविण्याकरीता विद्यापीठाने "कमवा व शिका" ही योजना अंमलात आणली आहे. गरीब, होतकरु व नियमित विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असतांना निवडक स्वरुपाच्या व शैक्षणिक बाबींशी निगडीत कामांची संधी उपलब्ध करुन त्याच्या मोबदल्यात नियमानुसार योग्य तो आर्थिक मोबदला देऊन त्यांच्या काही प्रमाणात आर्थिक गरजा भागविणे व त्यांच्या शिक्षणास हातभार लावणे हा योजनेचा मुख्य उद्देश असुन सदर योजनेचे नियम याद्वारे विहित करण्यात आलेले आहेत.

(७.२) सदर योजनेचा लाभ केवळ विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रमाचे नियमित शिक्षण घेणारा, मागील शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असेल. खालील विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असतील :-

(I) पदव्युत्तर (Postgraduate ) अभ्यासक्रमाचा विद्यार्थी ;

(II) आंतरवासियता (Internship) प्रशिक्षणार्थी;

(III) अनिवासी भारतीय (Non Resident Indian - NRI) विद्यार्थी ;

(IV) परराज्यातून आलेले (Other than Maharashtra State– OMS) विद्यार्थी ;

(७.३) विद्यार्थ्यास केंद्र / राज्य शासनाच्या किंवा अन्य संस्थाकडून शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, फेलोशिप शुल्क परतावा, शुल्क सवलत किंवा इतर काही अनुदान मिळत असले तरी देखील असे विद्यार्थी सदर योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असतील.

(७.४) कमवा व शिका योजनेचा कालावधी एका शैक्षणिक वर्षात ८ महिने असुन कमवा व शिका योजनेतंर्गत महाविद्यालयातील पात्र ठरविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना कामाचा आर्थिक मोबदला म्हणुन आठ महिन्यांकरीता रु.१६,०००/- प्रती विद्यार्थी या प्रमाणे अनुदान अनुज्ञेय असेल. विद्यापीठाचे सदर अनुदान प्रति तास रु.५०×२ तास ×२० दिवस = रु.२,०००/- दरमहा ×०८ महिने = रु.१६,०००/- अशाप्रकारे सुट्टयांचे दिवस वगळून दरमहा, आठ महिन्यांकरीता असेल.

(७.५) ज्या आवेदनकर्ता विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न शासन / विद्यापीठाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असेल असे विद्यार्थी योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतील. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करताना ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न सर्वात कमी असेल अशा विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. सदर योजनेंतर्गत विद्यापीठाच्या

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

...अंदाजपत्रकात सदर योजनेकरीता केलेल्या आर्थिक तरतूदीच्या कमालमर्या[illegible] अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

(७.६) कमवा व शिका योजनेसाठी उत्पन्नाचा समान निकष धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी पात्र उमेदवाराची निवड करण्यासाठी क्रमाने खालील निकषांचा अवलंब करण्यात येईल.

अ) मागिल वर्षाचे गुण (ज्या विद्यार्थ्यास जास्त गुण असतील तो पात्र)

ब) प्रयत्न (Attempts) (मागील वर्षात किती प्रयत्नांमध्ये विद्यार्थी उत्तीर्ण झाला)

क) मुलींना प्राधान्य.

(७.७) कमवा व शिका योजनेचा आठ महिन्यांचा कालावधी संपताच १५ दिवसांच्या आत समायोजनासाठी महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल. **महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावात अर्जामध्ये महाविद्यालयाचे बॅंकेचे खाते असलेले नाव, खाते क्रमांक, आय.एफ.एस.सी. कोड, बॅंकेची शाखा, बॅंकेचा पुर्ण पत्ता नमुद करणे अनिवार्य असेल. (जेणे करुन महाविद्यालयाच्या बॅंक खात्यामध्ये ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर / आर.टी.जी.एस. द्वारे अनुदानाची रक्कम जमा करणे सोईस्कर होईल) .**

(७.८) विद्यार्थ्याने / महाविद्यालयाने प्रस्ताव व प्रस्तावासोबत जोडुन सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे/दस्तऐवज खालीलप्रमाणे आवश्यक कागदपत्रे/ दस्तऐवज जोडून सादर करणे आवश्यक असेल.

(I) विद्यार्थ्याचा प्राचार्यांनी साक्षांकीत केलेला नमुना अर्ज

(II) लगतच्या गतवर्षी अभ्यासक्रमाच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेच्या गुणपत्रकाची स्वसाक्षांकित छायाप्रत.

(III) विद्यार्थ्याच्या पालकांचा मागील आर्थिक वर्षाचा संबंधित तहसीलदार कार्यालय / यथाचित प्राधिकारी यांनी दिलेला वार्षिक उत्पन्नाच्या दाखल्याची स्वसांक्षांकित प्रत. (इतर कोणत्याही प्रकारचा दाखला ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी.)

(IV) विद्यार्थ्याच्या आधारकार्डची स्वसाक्षांकीत छायाप्रत.

(७.९) विद्यार्थ्यास केलेले कामाचे वाटप, विद्यार्थ्याची त्यासाठीची उपस्थिती व विद्यार्थ्यास अनुदानाची रक्कम अदा केल्याची पावत महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल.विद्यार्थ्यास कामाच्या वाटपाची संपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाची असेल.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

(स्टायपेन्ड) मिळत असल्यास असे विद्यार्थी संजीवनी सुरक्षा योजनेव्यतिरिक्त इतर योजनेचा लाभ घेण्यास पात्र नसतील.

(८.७) सदर सर्व योजनांकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतिरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्तीचे पालन करणे महाविद्यालय व लाभार्थी विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

(८.८) सदर सर्व योजनेअंतर्गत विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना देण्यात येणारे अर्थसहाय्य / अनुदान हे विद्यापीठाच्या स्वनिधीतून देण्यात येत असल्याने, सदर योजनेचा लाभ विद्यार्थी / विद्यार्थ्याच्या पालकांना मिळणारी एक अतिरिक्त सवलत असुन योजनेचा लाभ हा त्यांचा हक्क असणार नाही.

(८.९) सदर योजनांकरीता अटी व शर्तीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेले असतील.

(८.१०) सदर योजनांपैकी कुठलीही योजना कुठल्याही स्तरावर बंद करण्याचा किंवा त्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असतील.

(८.११) उपरोक्त नियमावलीत सुधारणा/बदल/निरसन करण्याचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस अधिकार असेल. अशा सुधारणा/बदल/निरसन परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् करण्यात येतील व परिपत्रकाद्वारे प्रसिध्द् करण्यात येणाऱ्या अशा सुधारणा/बदल/निरसन हे उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येतील.

(८.१२) सदर योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांकडुन आवेदन मागवु शकेल. ऑनलाईन आवेदनाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक काढुन त्याबाबतची प्रक्रिया विहित करेल. उक्त नियमावलीत नियम विहित असले तरी ऑनलाईन प्रक्रियेच्या अनुषंगाने विद्यापीठाने परिपत्रकान्वये विहित केलेले नियम सदर नियमांची जागा घेतील. अशाप्रकारे प्रख्यापीत करण्यात आलेले परिपत्रक उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.

## योजनांसंबधी संकिर्ण तरतुदी

(८.१) धन्वंतरी विद्याधन योजना, बहि:शाल शिक्षण मंडळ योजना, सावित्रीबाई फुले मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना, संजीवनी विद्यार्थी सुरक्षा योजना आणि कमवा व शिका योजना या योजनेंतर्गत नियम ठरविणे, नियमांचा अर्थ लावणे तसेच, योजनेंचे लाभार्थी ठरविणेबाबतचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

(८.२) सदर सर्व योजनेंतर्गत विहित मुदतीत विद्यापीठास महाविद्यालयामार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विद्यापीठाच्या प्रशासकीय स्तरावर छाननी करण्यात येईल. छाननीअंती पात्र प्रस्तावांची यादी तयार करण्यात येवुन अनुदान वाटपासंबंधी कार्यालयीन टिप्पणीस कुलगुरु यांचे मान्यतेनंतर सदर टिप्पणी, पात्र विद्यार्थ्यांची आवश्यक माहितीसह यादी, अनुदानाची रक्कम व इतर यथोचित माहितीचा तक्ता क्रेडीट नोटसह पडताळणी व अनुदानाचे धनादेश/धनाकर्ष तयार करणेकरीता किंवा ईलेक्ट्रॉनीक ट्रान्सफरकरीता विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात येईल. सदर प्रशासकीय प्रक्रिया निर्धारित करण्याचा किंवा त्यामध्ये बदल करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(८.३) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे सिध्द् झाल्यास संबधीत विद्यार्थ्यावर कायदयानुसार शिस्तभंगाची/फौजदारी कारवाई करण्यात येईल / करण्याबाबत संबंधीत महाविद्यालयास निर्देशित करण्यात येईल.

(८.४) सदर सर्व योजनेंतर्गत लाभ घेताना लाभार्थी विद्यार्थी त्याचा प्रस्ताव, त्यामधील माहिती व त्यासोबतची दस्तऐवज यांच्या सत्यतेकरीता वैयक्तिक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यतेच्या पडताळणीची जबाबदारी लाभार्थी विद्यार्थ्याबरोबरच संबंधित महाविद्यालयांच्या अधिष्ठाता/प्राचार्य यांची असेल.

(८.५) कोणत्याही योजनेंतर्गत सादर केलेला प्रस्ताव अपुर्ण असेल किंवा निर्धारीत मुदतीनंतर विद्यापीठास प्राप्त झाला असेल तर सदर प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास अधिकार असेल. ई-मेलव्दारे प्राप्त झालेले प्रस्ताव स्वीकारले जाऊ नयेत. अपुर्ण किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावासंबंधी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांकडुन तक्रार प्राप्त झाल्यास सदर तक्रारीची संपुर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयांवर असेल.

(८.६) शासनाकडुन, यथोचित प्राधिकरणाकडुन किंवा एखादया संस्थेकडुन विद्यार्थ्यास विद्यावेतन

Principal
Suretech College of Nursing
Nagpur.